DRAFT PAPER TO BE CORRECTED & FINALISED

Internal circulation. FOR NAGESHBHAI

## रोजगार हमी योजना

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ग्रामीण विकासाच्या दृष्टीने लक्ष केंद्रित करण्याकडे अधिक कल होता. लोकसंख्येची वाढ झपाट्याने होत होती. महाराष्ट्रातसुध्दा तीच परिस्थिती होती. लोकसंख्येच्या वाढीतून ग्रामीण भागात बेरोजगारीचे प्रमाण वाढले होते. स्वातंत्र्यानंतरची १५वर्षे उलटून गेल्यानंतर महाराष्ट्रात शेती विकासात प्रगती झाली नव्हती. पावसाच्या अनियमितपणामुळे महाराष्ट्रातील काही भागात शेती उत्पादनावर परिणाम होत असे. सर्वसाधारणपणे जे भाग ओलिताखालील आहेत तेथे खरीप व रब्बी या दोन हंगामात पिके घेतली जातात. १९६० साली १ कोटी ८८ लाख हेक्टर जमीन लागवडीखालील होते त्यापैकी केवळ ५ टक्के म्हणजे सुमारे ५ लाख ५८ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखालील होते. १९८५ मध्ये लागवडी खालील जमीनीचे क्षेत्र २ कोटी १लाख हेक्टर असून त्यातील १३टक्के म्हणजे २६ लाख हेक्टर जमीन ओलिताखाली आहे. महाराष्ट्रातील सुमारे ३५ टक्के भाग ( ८७ तालुके ) कमी पर्जन्यक्षेत्राचे व अवर्षणाच्या क्षेत्रातील आहेत.

१९६५ साली महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यात प्रायोगिक तत्वावर एकात्मिक ग्राम विकासयोजना राबविण्यात आली त्यातून ग्रामीण जनतेला उत्पादक रोजगार देऊन त्यांचे उत्पन्न वाढविण्याविषयीचा एक अनोखा प्रयोग करण्यात आला.भूमिहीन शेतमजूराला शेतकऱ्याकडे ९० ते १२० दिवस रोजगार मिळतो.बाकीचे दिवस त्याला बेरोजगारी मध्ये काढावे लागतात. विशेषत भूमिहीन शेतमजूर आणि अत्यल्पभूधारक तसेच सिमांतिक कामगारांना हा रोजगार देण्यात आला. या प्रयोगाद्वारे ग्रामीण जनतेला रोजगाराच्या प्रक्रीयेत सामावून घेण्याविषयीचे उद्दीष्ट सफल झाले. पुढे १९६९ पर्यंत प्रायोगिक तत्वावरील प्रयोग महाराष्ट्रातील काही दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये करण्यात आले. या प्रयोगामागे फॅमिन कोड १८९० मधील दुष्काळी भागातील लोकांना काम देण्याविषयी तरतूदीचा साकल्याने विचार करण्यात आला होता.

या प्रयोगिक योजनेद्वारे रोजगार हमी योजनेच्या निर्मितीकडे वाटचाल सुरू झाली.

१९७२ -७३ साली महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला होता या दुष्काळामुळे ग्रामीण जनतेवर बेकारी व उपासमारीचा प्रसंग आला. शेकडो गुरेढोरे चारा पाण्यावाचून मरण पावली. दुष्काळासारख्या परिस्थितीवर मात करण्यासाठी कायम स्वरूपी उपाययोजना करण्यासाठी शासन दरबारी विचार विनिमय झाला होता. अगोदर घेतलेल्या प्रायोगिक तत्वावरील योजनेला प्राधान्य देऊन रोजगार हमी योजनेची निर्मिती करण्यात आली. ग्रामीण भागात उपलब्ध असलेल्या अतिरिक्त मनुष्यबळाचा योग्य प्रकारे उपयोग करून, पिण्याच्या व सिंचनाच्या पाण्याचा प्रश्न गावपातळीवर सोडविण्यासाठी या योजनेद्वारे अग्रक्रम देऊन त्याद्वारे ग्रामीण जनतेला रोजगार देण्याची कल्पना पुढे आली.

मे १९७२ मध्ये रोजगार हमी योजना कार्यान्वीत करून एक क्रांतीकारी पाऊल महाराष्ट्र शासनाने उचलले. भारतीय राज्यघटनेतील काही तरतूदीप्रमाणे रोजगाराची हमी देणे शासनास बंधनकारक आहे. घटनेच्या कलम ४१ अन्वये प्रत्येक व्यक्तीला काम करण्याचा अधिकार '' कामाचा अधिकार '' देण्यात आला आहे. रोजगार हमी योजनेच्या निर्मिती मध्ये घटनेतील तरतूदीची पार्श्वभूमी आहे. १९७२ -७३ साली सुरू करण्यात आलेल्या या योजनेला दोन वर्षे ग्रामीण जनतेकडून चांगला प्रतिसाद मिळाला. दुष्काळी भागातील शेतमजूर व कामगारांना काम देण्याची फॅमिन कोड १८९० प्रमाणे पध्दत होती. १९७४-७५ साली हीच योजना नव्याने सुरू करण्यात आली. तत्पूर्वी २०एप्रिल,१९७४ रोजी ' दुष्काळी भागातील शेतमजूर व कामगारांना काम मिळालेच पाहीजे' या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्रातील सुमारे १५ लाखाहून अधिक शेतमजूर व कामगारांनी संप केला. लोकांनी हजारोंच्या संख्येने तहसिल व जिल्हाधिकारी कार्यालयांवर तिव्र निदर्शने केली. तेव्हाचे कामगार व शेतमजूर हे अतिशय आक्रमक होते तशाच त्यांच्या संघटनासुध्दा तितक्याच आक्रमक होत्या. शेतकरी शेतमजूर पंचायत, महाराष्ट्र राज्य शेतमजूर परीषद, समाजवादी पक्ष, लाल निशाण पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, रिपब्लीकन पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व भारतिय कम्युनिस्ट पक्ष इत्यादी संघटनांनी या संपामध्ये व आंदोलनात सक्रीय सहभाग घेतला होता. याचाच परिणाम शासनावर होऊन ' काम देण्याविषयी विचार विनिमय करण्यात येऊन काम देण्यात येईल' अशी जाहीर घोषणा तत्कालीन सरकारने केली.

सदर योजना कार्यान्वीत करण्याविषयी महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये एकमताने ठराव संमत झाल्यानंतर तत्कालीन विधानसभाध्यक्ष श्री. बाळासाहेब भारदे व मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी सदर योजना अंमलात आणण्याविषयीचा शासन निर्णय दि.२० डिसेंबर,१९७४ रोजी संमत केला.

**रोजगार हमी अधिनियम १९७७:**

महाराष्ट्र शासनाद्वारे रो.ह.यो. अधिनियम १९७७ करण्यात आला. 'क' वर्ग नगरपालीका, नगरपरिषद क्षेत्रामध्ये कामाची गरज असलेल्या अकुशल व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देण्याची तरतूद या अधिनियमाद्वारे करण्यात आली आहे. कलम ३ व ८ प्रमाणे कामाची गरज असलेल्या अकुशल व्यक्तीने कामाची मागणी केल्यापासून १५ दिवसांच्या आत रोजगार उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात आली आहे. सदर काम उपलब्ध करून देणे शक्य न झाल्यास कामाची मागणी केलेल्या व्यक्तीला बेरोजगारी भत्ता शासनाकडून ठरविण्यात आलेल्या दराप्रमाणे देण्याची जबाबदारी शासनाची आहे. रो.ह.यो. निधीतून हा भत्ता देण्याची तरतूद या अधिनियमात केली आहे. अहमदनगर येथील श्रीम. इंदिरा जयसिंग यांनी दाखल केलेल्या याचिकेनंतर उच्चन्यायालयाने बेरोजगारी भत्त्यात वाढ करण्याच्या सूचना शासनाला केल्यानंतर सदर भत्ता एक रूपया ऐवजी दोन रूपये करण्यात आला.

**रो.ह.यो.चे क्रांतीकारी स्वरूप:**

खेड्याचा विकास खेड्यानेच करावयाचा आहे या संकल्पनेत फार मोठी शक्ती एकवटलेली आहे.सदर योजनेच्या बाबतीत हेच तत्व लागू होते. कामाची मागणी केलेल्या लोकांना ते राहत असलेल्या गावापासून ५ कि.मी.च्या परिसरात काम उपलब्ध करून देण्यासंबंधीचा नियम होता. त्यात बदल करून आता ८ कि.मी.च्या परिसरात काम उपलब्ध करून देण्यासंबधीची सुधारणा करण्यात आली होती. एखाद्या गावात ५० मजूर उपलब्ध असल्यास अथवा चालू कामांमध्ये मजूर सामावून घेणे शक्य न झाल्यास नविन कामे काढण्यात येतात. अशा कामांवर कामाची मागणी केलेल्या मजूरांना सामावून घेण्यात येते.

**लेबर इंटेन्सिव्ह:**

अधिकाधिक मजूरांना लाभ मिळवून देण्यासंबंधीची तरतूद केली आहे. एकूण खर्चापैकी अकुशल कामांसाठी ६० टक्के आणि कुशल कामे व साधनसामुग्री साठी४०टक्के म्हणजेच ६०:४० या प्रमाणात खर्चाची विभागणी करण्यात येऊन ६० टक्के खर्च अकुशल कामांच्या मजूरीवर करण्यासंबंधीची मूळ तरतूद होती. त्याद्वारे अधिकाधिक रोजगार देण्याकडे कल होता. रो.ह.यो.समितीने १९९५-९६ साली दिलेल्या अहवालात योजनेचा ५०:५० या प्रमाणात अकुशल व कुशल असे कामाचे प्रमाण केले तर अधिक कामे घेता येतील. अशी शिफारस केली होती. त्या शिफारशीचा विचार करून शासनाद्वारे १९ऑक्टोबर,१९९६ रोजी ५१:४९ असे अकुशल व कुशल खर्चाचे प्रमाण निश्चित करण्याचा शासन निर्णय संमत करण्यात आला. या निर्णयामुळे योजनेच्या लेबर इंटेन्सिव्ह म्हणून असलेल्या वैशिष्ट्यास पूर्णपणे तडा गेला आहे.

रोजगार हमी योजना ही महाराष्ट्रास भूषण ठरल्याने इतर काही राज्यांनीसुध्दा या योजनेस आपलेसे केले आहे. केंद्रीय पातळीवर ही योजना सुरू करून रो.ह.यो.ची व्याप्ती देशभर वाढविण्यात यावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत.इतर राज्यांमध्ये ही योजना सुरू करण्यात यावी अशी मागणी पूर्वीपासून होत आहे. दक्षिण आशियाई विकास कार्यक्रमात रो.ह.यो.यशस्वी ठरली होती. तर जागतिक बँकेने काही वर्षांपूर्वी अशी योजना अविकसित राष्ट्रांमध्ये सुरू करण्यासंबंधीच्या शिफारशी दिल्या होत्या.

**रो.ह.यो.निधी:**

रो.ह.यो.चे आर्थिक व्यवस्थापनासाठी आवश्यक असलेला निधी स्वतंत्रपणे संकलित करण्यासाठी रो.ह.यो.अधिनियम १९७७ च्या कलम १२ (२ व ३,अ,ब,क ) अन्वये व्यवसाय कराद्वारे निधी संकलन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य व्यापार आजिविका व नोकऱ्यांवरील कर अधिनियम १९७५ च्या कलम ४ अन्वये निधीमध्ये हस्तांतरीत केलेल्या रकमाएवढेच अंशदान राज्य शासनाने द्यावयाचे आहे. रो.ह.यो.अधिनियम कलम १२ नुसार शासनाने

वेळेवेळी विविध करांद्वारे निधी संकलन केले आहे.या करांमध्ये वेळोवेळी सुधारणा होऊन कराच्या रकमेत आवश्यकतेनुसार वाढ करण्यात आली आहे.

**निधीचा वापर :**

रो. ह. अधिनियम १९७७ कलम १२ (४,५,६,७ ) नुसार निधीचा वापर करण्यासंबंधीचे निर्देश दिले आहेत. रोजगार निर्मिती व उत्पादक मालमत्तांची निर्मिती करणे या उद्देशांसाठी व उद्दिष्टपूर्तीसाठी तसेच इतर निर्माणीय योजना व योजनांतर्गत योजना यांच्याकरिता वापरण्यासाठी निधी तात्पुरता वळविण्यास राज्यशासनाला त्या किंवा पुढील वर्षामध्ये अशा रकमेद्वारे निधीची प्रतिपूर्ती करण्यात येईल या शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येईल. १९२-९३ मध्ये १२४०.२४ कोटी मार्च १९९५ अखेरीस रू.१८२१ कोटी व मार्च १९९६ अखेरीस रू.२१८९ कोटी इतकी प्रचंड रक्कम रो. ह. यो. निधीत जमा झाली होती.

महाराष्ट्र शासन रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून ओव्हर ड्रॉफ्ट घेण्यासाठी रो. ह. निधीचा हमी ( सुरक्षितता ) म्हणून उपयोग करीत आहे. राज्यातील रोजगाराची एकूण गरज लक्षात घेतली तर या योजनेखाली निर्माण होणारा रोजगार अगदीच नगण्य आहे. अवर्षणाकडे पूर्णतया दुर्लक्ष केले आहे. रोजगार हमी योजनेची शिल्लक रक्कम प्रचंड आहे. या निधीतील रक्कम कायद्याप्रमाणे केवळ रो. ह. यो. च्याच कामांसाठी खर्च केली पाहिजे परंतु योजनेसाठी जमा झालेली रक्कम खर्च न करता सरकार वर्षानुवर्षे साठवून ठेवीत आहे. उदा. १९९२ - ९३ अंदाजपत्रकात रो. ह. यो. चा खर्च ३०८.५५ कोटी इतका आहे. तर योजनेसाठी जमा होणारी रक्कम ६२० कोटी इतकी आहे, म्हणजेच यातील बोलाला रक्कम ( ५६२.१२ - ३०८.५५ = ३११.५७ कोटी रुपये ) शिल्लक ११२१.५७ कोटीमध्ये जमा झाली होती. ही प्रचंड शिल्लक रक्कम १,१२१.५७ कोटी रुपये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियात नुसतीच पडून होती. मार्च १९९६ अखेर २,१८९ कोटी इतकी रक्कम शिल्लक असताना केवळ ४५० कोटी खर्च करण्यात येऊन १७३९ कोटी रूपयांचा रिझर्व्ह बँकेकडून ओव्हरड्राफ्ट घेण्यासाठी हमी म्हणून उपयोग केला जात आहे. एवढ्या प्रचंड रकमेचा सातत्याने ओव्हरड्राफ्ट घेण्यासाठी वापर करणे याचा अर्थ सदर निधीची रक्कम दुसऱ्या कामांसाठी मागील दाराने उपयोगात आणणे असाच होतो.

**रो.ह.यो.ची वैशिष्ट्ये :**

- ग्रामीण बेरोजगाराला कामाची हमी.
- काम देऊ न शकल्यास बेरोजगार भत्ता.
- दुष्काळाची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी जलसंधारण कामांवर अधिक भर.
- कायमस्वरूपी सार्वजनिक मालमत्ता निर्माण करण्यासंबंधी योगदान .
- संघटीत क्षेत्रातील कामगारांकडून व्यवसाय कराद्वारे निधीची उभारणी , कामगारांच्या उत्पन्नातील १ टक्का रो.ह.यो. निधीसाठी, महाराष्ट्र टॅक्स अधिनियम १९७५ द्वारे जमा होणाऱ्या रकमा, दोन्ही मार्गाद्वारे जमा होणाऱ्या रकमे इतकीच रक्कम राज्यशासनाचे अंशदान.
- स्थानिक पातळीवर रोजगार निर्गिती.
- कामगार हितार्थ ( लेबर इंटेन्सिव्ह स्किम ) .

**रोजगार हमी वरील रोजगाराचा कालावधी आणि मजूरी:**

रो.ह.यो.वरील कामे शेतीच्या हंगामात न काढता ती शेतीचा हंगाम संपल्यानंतर काढण्यात येतात. यामागचे प्रमुख कारण शेतीच्या कामांवर योजनेचा विपरीत परिणाम होऊ नये हेच होते. शेतीच्या कामांना प्राधान्य देण्यात येते. रो.ह.यो.वरील मजूरीचे दर हे शेतमजूरीशी निगडीत असे ठेवण्यात आले आहेत. त्याची रचना पुढीलप्रमाणे ४ परिमंडळांमध्ये ( झोन ) मध्ये केली आहे.

झोन एक - सिंचनाखालील / ओलिताखालील क्षेत्र

जोन दोन - मध्यम सिंचनाखालील / ओलिताखालील क्षेत्र

झोन तीन - अल्प सिंच... / ओलिताखालील क्षेत्र

झोन चार - दुष्काळग्रस्त / अवर्षण प्रवण क्षेत्र.

रो.ह.यो.वरील कामांसाठी देण्यात येणारी मजूरी ही प्रत्येकी ७ तास काम केल्यानंतर देण्यात येते. शेतमजूरांने व रो.ह.यो.कामगा... हे सारखेच आहे.

| | झोन १ | झोन २ | झोन ३ | झोन ४ |
|---|---|---|---|---|
| | रू.५.५० | रू.५.०० | रू.४.५० | रू.४.०० |
| | रू.१२.०० | रू.८.०० | रू.७.०० | रू.६.०० |
| ...८८ | रू.२०.०० | रू.१६.०० | रू.१४.०० | रू.१२.०० |
| ...९४ | रू.२९.०० | रू.२६.०० | रू.२३.०० | रू.२०.०० |

**कामासाठी ...**

१९७८-७... ...ासाठी अन्न' योजनेखाली रोजगार हमी कामगारांना दररोज किमान एक किलो व कामाच्या वाढीबरो... ...त सकस धान्य सवलतीच्या दराने देण्याचे धोरण स्विकारण्यात आले. त्यानंतर नियमात बदल करून त... ...ऐवजी अर्धा किलो च्या प्रमाणात देण्यात येऊ लागले. नंतर केंद्र सरकारकडून अपुरा धान्य पुरवठा होतो ... ...ून धान्यासाठी केवळ २५ पैशांची कूपन्स देण्याची पध्दत अवलंबण्यात आली. शेतमजूर व रोजगार हमी ... ...म्हणी खर्चात अन्नधान्यावरचा खर्च हा मुख्य घटक असल्याने धान्य पुरवठ्यातील कपात म्हणजे रो ह.यो ... वेतनातील कपात आहे असा आरोप कोपरगाव येथे झालेल्या शेतमजूर व रोजगार हमी कामगार सम... ... परिषदेत करण्यात आला. कामासाठी अन्न ही योजना १९८१ पर्यंत सुरू होती.

... ... ह.यो.वर देण्यात येणारी मजूरी इतर कामांवर देण्यात येणाऱ्या मजूरीपेक्षा कमी आहे. असे मत आग... ...त दळवी समितीने व्यक्त केले आहे. मजूरी कमी असल्याने मजूरांची उपस्थिती अतिशय कमी होत अ... ... सदर समितीने व्यक्त केली आहे. परिणामी योजनेतील बहुतांश कामे पूर्ण न होता अपूर्ण अवस्था ... ...ून राहतात. या कामांवर खर्च करण्यात आलेल्या कोट्यवधी रूपयांचा लाभ कामे अपूरी राहिल्याने ज... ...ळत नसल्याची खंत समितीने व्यक्त केली आहे.

... ...ण्यात येणारी मजूरी ही सात दिवस काम केल्यानंतर मिळते. ही मजूरी देताना त्याने केलेल्या कामाचे ...न केले जाते. वनखात्यातील रो. ह.यो. वर ५ घन मीटरचा खड्डा करून त्यातील माती काढणारा मजूर पूर्ण ...ळण्यास पात्र ठरतो. हे काम पूर्ण झाले नाही तर त्याला मजूरी पूर्ण मिळत नाही. मिळणारी मजूरी पैसे उशिरा ...बऱ्याच विलंबाने मिळते. हे सुध्दा मजूर उपस्थिती कमी होण्यामागचे एक कारण आहे.

... .**अंमलबजावणी यंत्रणा:**

जिल्हा... ...री - जिल्हा पातळी योजनाप्रमुख.

तहसि... ...र - तालुकापातळीवर योजना समन्वयक.

तलाठी ...ग्रामसेवक - ग्रामपातळी अंमलबजावणी अधिकारी.

रो. ह.यो.च्या अंमलबजावणीच्या बाबतीत गावातील अंमलबजावणी अधिकारी म्हणून तलाठी किंवा ग्रामसेवक यांची नियुक्ती केली आहे. त्यांच्याकडे काम मिळावे यासाठी नोंदणी करण्याची आवश्यकता असते. विचारपूस करूनही माहिती न मिळाल्यास तहसिलदाराकडे लेखी अथवा तोंडी चौकशी करता येते. काम मिळण्यासंबंधीची नोंदणी करून झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत काम मिळाले नाही तर बेरोजगारी भत्त्याची मागणी करता येते. दर दिवसासाठी २रूपये बेरोजगार भत्ता मिळतो. हा भत्ता कामाला पर्याय नाही. भत्त्याची मागणी करणे म्हणजे कामापासून वंचित राहणे असा होत नसून या भत्त्याची मागणी केल्याशिवाय कामाची निर्मिती लवकर होत नाही. बेरोजगारीवर उपाय म्हणजे बेरोजगार भत्ता नाही. मजूरा ना काम हवे असते तो फक्त कामाचीच मागणी करू शकतो. भत्ता नव्हे. सरकारने दिलेल्या हमीचा भंग होतो. कायद्याच्या भंगाविषयी दंड म्हणून रो.ह.यो. कायद्यात बेरोजगार भत्त्याची तरतूद करण्यात आली आहे.

कामासंबंधीची तलाठी अथवा ग्रामसेवकाने दवंडी न देणे नाव नोंदविले न जाणे. नाव नोंदणीचे छापील अर्ज कार्यालयात नसणे नाव नोंदविण्यासाठी गरजू कामगार कार्यालयावर गेल्यास कार्यालयात तलाठी अथवा ग्रामसेवक हजर नसणे. नाव नोंदणी करण्यास नकार देणे. अशा सार्वत्रिक अनुभव असल्यासंबंधीचा उल्लेख कोपरगाव येथे झालेल्या परिषदेत रोजगार हमी विषयक ठरावात केला आहे. ( सदर परिषद शेतमजूर रोजगार हमी कामगार समन्वय समितीमार्फत १९८४ मध्ये घेण्यात आली होती.

रो.ह.यो.च्या कामासाठी शासनाने ठरवून दिलेल्या २३रूपये हा मजूरीचा दर ग्रामीण भागातील ( कल्याण )जिल्ह्यातील शेतमजूर व बेरोजगारांना अत्यंत कमी वाटतो. कल्याण येथे मोठे मोठे कारखाने असल्याने लोकांना चांगली मजूरी देणारा रोजगार उपलब्ध होतो. रो.ह.यो.ची कामे ठेकेदारांकडे केल्यास कमीतकमी ५० रूपये मजूरी मिळते. येथील मजुरांना मजुरीचे दर कमी वाटतात म्हणून दोन मजुरांची मजूरी एका मजुरास देऊन त्या मजुरांकडून रोजगार हमीची काही कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न या अगोदर अधिकाऱ्यांनी केला होता. तथापि अधिकाऱ्यांच्या या पद्धतीमुळे विपरित परिणाम झाला अधिकारी मजुरी वाटपात भ्रष्टाचार करतात असा आरोप त्यावेळी करण्यात आला त्यामुळे आता कोणताही अधिकारी रोजगार हमी योजनेचे काम नियमाबाहेर जाऊन स्वतःच्या हमीवर करण्यास तयार होत नाहीत. परिणामी रो. ह. यो. समितीने कामांना मंजुरी दिली तरी कल्याण तालुक्यातील कामे कागदावरच राहणार ( नवशक्ती १८ जाने. १९९७)

**योजनेत होणारा भ्रष्टाचार :**

प्रत्येक जिल्ह्यासाठी रो. ह. योच्या कामांसाठी सरासरी १४ ते १७ कोटी रुपयांची तरतूद असते. अनेकदा ही रक्कम जिल्हा विकास व नियोजन आराखड्यापेक्षा जास्त असते. भंडारा, वर्धा, उस्मानाबाद, नांदेड या जिल्ह्यांच्या बाबतीत असे अनेकदा घडले आहे. रो. ह. यो. अंतर्गत सुरू असलेल्या कामांवर देखरेख ठेवण्यासाठी प्रत्येक खात्यांतर्गत एक दक्षता पथक असते. शिवाय विभागीय आयुक्त ( महसूल ) कार्यालयात अधीक्षक अभियंता दर्जाच्या तर जिल्ह्याधिकारी कार्यालयात उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली एक दक्षता पथक असते. नागपूर, अमरावती औरंगाबाद आणि नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयाने १९९५ तसेच १९९६ या दोन वर्षात रो. ह. यो. तील भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आणली आणि भ्रष्टाचारी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई केली.

रो. ह. योच्या कामातील भ्रष्टाचाराच्या सुमारे ४०० पेक्षा जास्त तक्रारींची या दक्षता पथकांनी २ वर्षात चौकशी केली याशिवाय अधिकाऱ्यांच्याच लक्षात आलेल्या गैरव्यवहारांची संख्या सुमारे १०० असण्याची शक्यता आहे. या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी केल्यावर २५० पेक्षा जास्त प्रकरणांत भ्रष्टाचार असल्याचे आणि त्यात ६०० पेक्षा जास्त अधिकारी, कर्मचारी गुंतले असल्याचे आढळून आले. मुळात एकदा खातेनिहाय चौकशी प्रक्रिया पूर्ण केल्यावर गंभीर प्रकरणातील जवळ जवळ ११० अधिकारी कर्मचाऱ्यांना प्रशासनातील संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी १९९५ आणि ९६ ह्या दोन वर्षात निलंबित केले. काही भ्रष्टाचाऱ्यांवर न्यायालयात आरोपपत्रे दाखल करण्यात आली असता. शासनाने त्यांचे निलंबन रद्द केले आहे. १९९५ - १९९६ या दोन वर्षामध्ये रो. ह. यो. च्या कामात भ्रष्टाचार झाल्याची २५० प्रकरणे उघडकीस आली त्यापैकी १२५ प्रकरणे मराठवाड्यातील होती.

| काम | भ्रष्टाचाराची प्रकरणे | भ्रष्टाचारी अधिकारी/कर्मचारी |
| --- | --- | --- |
| सार्वजनिक बांधकाम | ३५ | १०५ |
| सिंचन | ७१ | २१० |
| कृषी | ९ | ४० |
| वन | ६ | १५ |
| सामाजिक वनीकरण | ३ | ८ |
| महसूल | १ | २ |
| **एकूण** | **१२५** | **४८०** |

| जिल्हा | प्रकरणे | भ्रष्ट अधिकारी कर्मचारी |
|---|---|---|
| बीड | ३८ | १०४ |
| लातूर | ७ | २७ |
| औरंगाबाद | २० | ६२ |
| जालना | २८ | ३० |
| परभणी | २५ | ६३ |
| नांदेड | १६ | ७५ |
| **एकूण** | **१३४** | **३६१** |

मराठवाड्यातील **भ्रष्टाचाराच्या जवळ जवळ** ३०० तक्रारींची छाननी केल्यावर **एकूण १२५** तक्रारींमध्ये तथ्य आढळून आले. त्यात **३८० अधिकारी** कर्मचारी गुंतलेले होते. त्यापैकी किमान ७० जणांविरुद्ध **अतिशय** गंभीर स्वरुपाच्या बाबी वेगवेगळ्या चौकशीतून उघडकीस आल्या होत्या. ६५ जणांना फेब्रुवारी १९९७ मध्ये निलंबित केले. त्यापैकी ३० जणांचे निलंबन शासनाने रद्द ठरविले. चौकशी पथकाने केलेल्या प्राथमिक चौकशीत सकृतदर्शनी गैरव्यवहार निदर्शनास आल्यावर संबंधित अधिकारी सर्व कागदपत्रे पुढील चौकशीसाठी उपलब्ध करून **न देत** नाहीत. गैरव्यवहारांची कागदपत्रे **नष्ट करण्याचा प्रयत्न करतात.** भ्रष्टाचाराचे स्वरुप गंभीर असल्याने या अधिकारी कर्मचाऱ्यांना शासन सेवेतून बडतर्फ व्हायला हवे असे मत चौकशी अधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

१९९३ ते ९५ या दोन वर्षांच्या कालावधीत आलेल्या रो. ह. यो. मध्ये नाशिक, नगर, धुळे व जळगाव येथे मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे शासकीय चौकशीत आढळून आले आहे. **एकूण** महाराष्ट्राचा विचार केल्यास १७ ते २० कोटींपर्यंत भ्रष्टाचाराचा आकडा जाईल.

**रोजगार हमी योजनेतील महिलांविषयक तरतूदी : बाळंतपणाची रजा:**

रो.ह.यो. अधिनियम १९७७ (७/अ) प्रमाणे १५० दिवस काम केल्यानंतर बाळंतपणाची रजा मंजूर केली जाते. १९८९-९० सालच्या रो.ह.यो. समितीच्या पुणे येथील बैठकीच्या अहवालानुसार फक्त दोनच स्त्रियांना बाळंतपणाची रजा आणि ३६० रूपये सानुग्रह देण्यात आला.

दोनच स्त्रियांना बाळंतपणाची देण्यात आलेले रू.३६० रूपये सानुग्रह म्हणजेच ३० दिवसांसाठी १२ रूपये प्रतिदिनी या हिशोबाप्रमाणे वेतन देण्यात आले. तेव्हाच्या किमान वेतनापेक्षा देण्यात आलेले सानुग्रहाची रक्कम अतिशय कमी होती.

रो.ह.यो. वरील महिला मजूरांना देण्यात येणाऱ्या बाळंतपणाच्या रजेविषयी ७५ दिवस काम केल्यावर प्रत्येकी ५ दिवसास एक या प्रमाणे जास्तीत जास्त ३० दिवसांच्या मजूरी इतके सानुग्रह अनुदान मंजूर करून देण्यासंबंधीच्या सुधारणा ऑक्टोबर १९९६ पासून करण्यात आल्या आहेत.

स्त्री मजूराने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास १४ दिवसांच्या गैरहजेरीच्या कालावधीकरीता परिमंडळातील किमान मजूरीदेण्यात येईल. स्त्री मजूरीने तांबी बसविल्यास २ दिवस भरपगारी रजा देण्यात येईल.

**रो.ह.यो. वरील मजूरांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा:**

- कामाच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सुविधा
- दुपारच्या सुटीमध्ये आवश्यक तेथे निवाऱ्याची व्यवस्था
- प्रथमोपचाराची व्यवस्था
- तीन वर्षाखालील मुलांना सांभाळण्यासाठी दाईची व्यवस्था
- खडी फोडणाऱ्या मजूरांना प्लॅस्टीकचे चष्मे पुरविण्याची सोय.

- कामाच्या ठिकाणी शासकीय अवजारे हत्यारे उपलब्ध नसल्यास मजुरांनी स्वतः आणलेल्या अवजारे व हत्यारांना धार लावण्याचे पैसे व हत्यारांचे भाडे.
- ८ कि.मी. हून दूर असल्यास मजूरांना राहण्यासाठी मूलभूत सोयीसह, छावण्यांचे व्यवस्था तसेच तेथे जाण्यासाठी व काम संपल्यानंतर परत येण्यासाठी वाहनाची सोय किंवा एस्.टी. बसचे किमान भाडे
- स्वस्त धान्य दुकानातून धान्य मिळण्याची व्यवस्था.

रो.ह.यो.समितीने दिलेल्या प्रमुख शिफारशी

- मजूरीचे दर विनाविलंब वाढविण्यात यावेत.
- मजूरीचे वाटप विनाविलंब करण्यात यावे.मजूरी वाटपात विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर करवाई करण्यात यावी.
- जवाहर विहिरी कार्यक्रमांतर्गत लाभार्थींना पुरविण्यात येणाऱ्या निधीमध्ये रू.५०,००० पर्यंत वाढ करण्यात यावी.
- रो.ह.यो. अंतर्गत सुरू असलेल्या कामांच्या ठिकाणी मजूरांना मिळणाऱ्या सोयी सवलतींबाबत फलक लावण्याबाबत संबंधितांना सुचना देण्यात याव्यात.
- रो.ह.यो.मधून पूर्ण केलेले व जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या कामांची दुरूस्ती रो.ह.यो.मधून घेण्यात यावी
- रो.ह.यो.मधून घेण्यात आलेली तथापी पाच व दहा वर्षापेक्षा जास्त कालावधीनंतरही अपूर्ण असलेली कामे विशेष मोहिम हाती घेऊन पूर्ण करण्यात यावित.
- स्त्री मजूरांना मिळणाऱ्या प्रसूती सानुग्रह अनुदानाबाबतची माहितीचा स्वतंत्र फलक लावण्यात यावेत.
- रो.ह.यो.च्या कामाकरिता संपादन करण्यात आलेल्या जमिनींना मोबदला देण्यामध्ये होणारा विलंब टाळण्यात यावा.
- दुष्काळी व टंचाई परिस्थितीमध्ये रो.ह.यो.मधून घेण्यात येणाऱ्या कामांच्या सर्वेक्षणाकरिता वेगळा फंड निर्माण करण्याबाबत.
- रो.ह.यो.वर सुरू असलेल्या कामावरील अपघातग्रस्तांना त्वरीत सानुग्रह देण्यात यावा.
- प्रलंबित कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात होणारा विलंब टाळण्यात यावा.
- रो.ह.यो.मधून घेण्यात येणारी कामे सुरू करण्याबाबत ५ते८ कि.मी.पर्यंतच्या परिसराच्या मर्यादेत बदल करण्यात यावा.
- रो.ह.यो. करिता तालुका स्तरावर स्वतंत्र यंत्रणेची ( अधिकारी व कर्मचारी वर्ग ) उभारणी तात्काळ करण्यात यावी.
- रो.ह.यो.द्वारे काही नविन कार्यक्रम घेता येतील काय याचा समितीने विचार केला असता या योजनेची व्याप्ती वाढविणे आवश्यक आहे. अन्यथा दिवसेंदिवस मजूरांची उपस्थिती कमी होत जाईल. व योजनेचा मूळ उद्देश काही अंशी सफल होणार नाही असे समितीला वाटते.

**रो.ह.यो.च्या पुनर्विचाराची गरज:**

रो.ह.योच्या माध्यमातून गरीब , जिरायत शेतकऱ्याला महत्वाचा हक्क आणि आधार मिळाला. त्यातून ग्रामिण विकासाची प्रक्रिया वाढीला लागली. विशेष म्हणजे गेल्या १५ वर्षात ग्रामीण जिवनातील सर्व आर्थीक स्थिती बऱ्याच प्रमाणावर बदललेली असून त्यात रो.ह.यो.चे मोठे .योगदान आहे. बदलत्या आर्थिक परिस्थितीचे रो.ह.यो.वर परिणाम झाले असून आता रो.ह.योचा मुळापासून नव्याने विचार करण्याची गरज आहे. २५ वर्षांपूर्वी एका विशिष्ट परिस्थितीत रो.ह.यो. जन्माला आली आणि ती परिस्थिती बदलण्यात तिने मोठी भूमिका बजावली आहे. म्हणून आता नव्या परिस्थितीत जुने कार्यक्रम संदर्भहीन आणि दिशाहीन झाले आहेत.

रो.ह.योच्या पुनर्विचारासाठी काही मुद्दे नव्याने असावे लागतील. ते थोडक्यात पुढीलप्रमाणे. रोहयो बऱ्याच अंशी अवर्षणप्रवण भागात तुलनात्मक रित्या अधिक परिणामकारक ठरली कोकणात तिचा फारसा प्रभाव पडलेला नाही. याचून

एका अर्थी प्रादेशिक असमतोलासारख्या समस्या वाढीस लागल्या. आता मुख्य प्रश्न असा आहे की सर्व ग्रामीण भागात रोजगाराची किती आवश्यकता आहे याचा अंदाज बांधणे आवश्यक आहे. २५ वर्षांपूर्वी जिरायत शेतकऱ्यांना शेती व्यतीरिक्त कामाची गरज आहे हे सहजपणे मान्य होणारे विधान होते. आता एकूण ग्रामीण रोजगाराचा विचार केल्याशिवाय रोहयोचे स्थान ठरविता योणार नाही.

आदिवासी आणि दूर्गम भागात रोहयोनी अंमलबजावणी परिणामकारक का झाली नाही याचा तपास करायला हवा. आदिवासी भागातील कुपोषण आणि विशेषतः पावसाळ्याच्या मोसमातील भुकेची तिव्रता, या संदर्भात रोहयोने माध्यम कोणत्या अडचणीमुळे कमी पडले हे तपासले पाहीजे. रोहयोच्या नियम व तरतुदी या दुष्काळग्रस्त भागांना डोळ्यांपुढे ठेऊन करण्यात आल्यामुळे इतर विभागातील परिस्थितीचा, रोहयोच्या माध्यमातून मुकाबला करता आलेला नाही.

**अत्यल्प वेतन:** ग्रामीण रोजगाराची परिस्थिती बदलली असली तर रोहयोचा दर तुलनात्मक पातळीवर असावा लागेल अन्यथा रोहयोचे वेतन हे नेहमीचं निकृष्ट दर्जाचे राहिले आहे. मागास भागात अजूनही कितीतरी ग्रामीण विकासाची कामे मोठ्या संख्येने राहिली आहेत. तेव्हा स्थानिक मजूर पुढे न आल्यास त्या भागातील विकास कार्यक्रमांना कधीच उठाव मिळणार नाही. अशा परिस्थितीत काही भाग कायमचे अविकसित ठेवायचे काय हा प्रश्न पुढे येईल. रोहयो कामगारांचे वेतन हे शेतमजूरांच्या किमानवेतनाशी जोडलेले आहे. त्याची सांगड शेतमजूरांच्या किमान वेतनाशी न घालता शासनाच्या विविध विभागातील मजूरीच्या दराशी जोडले जोडून त्या दराप्रमाणे देण्यात यावी.

प्रचलित फळबाग विकास कार्यक्रम रोहयो अंतर्गत आहे. याचा पुनर्विचार व्हावा हा कार्यक्रम भ्रष्ट झाला आहे. शिवाय हलक्या जमिनीवर जिरायत फळबागायत करण्याची गुढ कलाना मागे पडली आहे. त्यातून निर्माण होणारा रोजगार हा नगण्यच आहे. आज रोहयो अंतर्गत भरपूर निधी उपलब्ध होत आहे. आणि त्या निधीकडे कोणाचे लक्ष नाही म्हणून आजचा फळबाग विकास कार्यक्रम राबविला जात आहे. हे चूकीचे आहे. फळबाग विकास कार्यक्रम स्वतंत्रपणे घेता येईल आणि त्यालेही दुसऱ्या संदर्भात महत्व आहे. परंतु रोहयो अंतर्गत या कार्यक्रमाची काय आवश्यकता आहे हा मूळ प्रश्न आहे.

श्रमशक्तीतून ग्रामविकास हा रोहयो अंतर्गत गणीतं महत्वाचा कार्यक्रम आज जवळपास विस्मृतीत गेला आहे. अर्थात हे अपयश नोकरशाहीचे नसून प्रमुख्याने राजकीय शक्तींचा अभाव आणि संघटनांचा निरूत्साह ही यामागील कारणे आहेत. मुख्य म्हणजे या कार्यक्रमांतर्गत गावपातळीवरचे नियोजन आणि त्यामध्ये असलेल्या पूर्वअटी यांचे महत्व फार आहे.परंतु श्री पागे यांच्या निधनानंतर रोहयोचा राजकीय पातळीवर सातत्याने विचार करणारा राजकीय विचारवंत नसल्याने श्रमशक्ती योजनेची परवड झाली आहे. या कार्यक्रमातील जलसंधारण संकल्पना पाणलोट क्षेत्रविकासाच्या संकल्पनेवर आधारलेली आहे.

**महिलांना रोजगार:** रोहयोमधील पारंपारीक कामापेक्षा कोणत्या नवीन कामाचा अंतर्भाव करता येईल याचा विचार करावा लागेल. विशेषतः ग्रामीण भागात आजही स्त्रियांच्या स्थानिक रोजगाराची निकड असून रोहयो स्त्री- मजुरांच्या दृष्टीने नेहमीच महत्वाची ठरली आहे. नव्याने जाहीर झालेल्या महिला धोरणामध्ये ही ग्रामीण रोजगाराचा विचार महत्वाचा आहे. यासाठी नवीन कामांचा विचार केला गेला पाहीजे.

सध्या रोहयोवर काढली जाणारी कामे इतक्या कमी प्रमाणात असता प्रचंड प्रमाणात जमाहोणाऱ्या रोहयो निधीचा विनियोग होतो आणि त्यातून किती प्रकारचे हिशोब भागवता येतात याचा लोकांपुढे हिशेब मांडला पाहिजे. या निधीच्या वापराविषयी बरेच समज अपसमज प्रचलित आहेत त्यांचे समाधानकारक निराकरण व्हायला हवे. रोहयोवर सध्या असलेली कर्मचाऱ्यांची संख्या अवास्तव आहे. शासन सेवेत कर्मचारी जास्त असले तर त्यांना खर्च रोहयो निधीतून भागविण्याची गरज नाही. रोहयो निधीचा वापर कसा करावा याची कायद्यात तरतूद आहे.त्या प्रमाणे व्यवहार होतो का नाही हे कळून घेण्याचा अधिकार लोकांना आहे. वास्तविक पाहता विधानसभेच्या बैठकांमधून याची चर्चा व्हायला हवी होती पण लोकप्रतिनिधींना या प्रश्नामध्ये जास्त रस नाही.

रोहयोच्या माध्यमातून जशी मोठ्या संख्येने कामे झाली तशीच मोठ्या संख्येने अपूरी राहीली आहेत. यातून झालेल भांडवली खर्च वाया जाणार आहे. हे उघड आहे. यासाठी ही अपुरी कामे विशेषतः पाण्याच्या साठवणुकीची कोणत्या मार्गाने लवकरात लवकर पूर्ण करता येतील याचा आढावा घ्यायला हवा. तसेच ज्या विविध कारणांमुळे ही कामे अर्धवट आणि अपूरी राहीली आहेत. त्यांचे विश्लेषण करून त्यावर तोडगा काढला पाहीजे. त्यामध्ये संशोधनाव्यतीरीक्त अधिक महत्वाची बाब आहे ती राजकीय इच्छाशक्तीची.

महाराष्ट्रात बऱ्याच छोट्यामोठ्या धरणांचे काम पूर्ण झाले आहे. परंतु काही धरणावरील कालवे झाले नाहीत धरणातील पाण्याचा कालव्याद्वारे सिंचनासाठी उपयोग केला जातो. परंतु जलसंभारण ( ईरिगेशन ) खात्याची कालव्याचे काम घेतल्यास पाचव्या वर्षी कालव्यात पाणी खेळले पाहीजे ही अट घालून व सदर अट मंजूर असल्यास मंत्रीमंडळाच्या मान्यतेने कामांना मंजूरी दिली जाते. परंतु पाचव्या वर्षी पाणी खेळेलच अशी हमी देता येत नसल्याने अनेक कालव्यांचे काम अजूनही हाती घेण्यात आले नाही.

## रोहयोने महाराष्ट्राला काय दिले.

### महाराष्ट्रातील सिंचनाखालील क्षेत्र ( क्षेत्र हजार हेक्टर मध्ये )

| वर्ष | एकूण सिंचनाखालील क्षेत्र | एकूण पिकाखालील क्षेत्र | एकूण सिंचनाखालिल क्षेत्राची पिकाखालिल क्षेत्राशी टक्केवारी. |
|---|---|---|---|
| १९६०-६१ | १२२० | १८८२३ | ६.४८ |
| १९७०-७१ | १५७० | १८७३७ | ८.३८ |
| १९८०-८१ | २४१५ | १९६४२ | १२.३० |
| १९९०-९१ | ३३१९ | २१८५९ | १५.१८ |
| १९९४-९५ | ३३०१ | २१४१८ | १५.४१ |

### महाराष्ट्रातील कृषी उत्पादन

| वर्ष | पिकाखालील क्षेत्र ( हजार हेक्टर ) | कृषी उत्पादन (दशलक्ष टन) | कृषी उत्पादन निर्देशांक |
|---|---|---|---|
| १९६०-६१ | १२२५५ | ७.७ | - |
| १९७०-७१ | १२८८६ | ५.४ | - |
| १९८०-८१ | १३६९१ | ९.५ | - |
| १९९०-९१ | १४३९३ | १२.२ | १३६.५ |
| १९९४-९५ | १३५२७ | ११.५ | १४०.० |

### भारतातील काही राज्यातील उत्पादन व दरडोई उत्पन्न

| राज्य | राज्य उत्पादन दरवाढ | दरडोई उत्पन्न | दरडोई राज्य उत्पन्न चालू स्थिती १९९३-९४ |
|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | ३.९ | १.८ | ६४८९ |
| आसाम | ५.३ | ३.१ | ५९१६ |
| बिहार | ३.९ | १.७ | ३६५० |
| गुजरात | ३.८ | १.८ | ७६०० |
| हरयाणा | ६.० | ३.५ | १०३५९ |
| कर्नाटक | ५.५ | ३.५ | ७०२९ |
| केरळ | ३.८ | २.४ | ६००९ |
| मध्य प्रदेश | ४.५ | २.० | ४७२५ |
| महाराष्ट्र | ६.३ | ३.९ | ११३६७ |
| ओरीसा | ३.५ | १.७ | ४७२६ |
| पंजाब | ५.७ | ३.३ | १२३१९ |
| तामिळनाडू | ५.४ | ३.९ | ६२०५ |
| उत्तरप्रदेश | ४.३ | २.० | ४७४४ |
| पश्चिम बंगाल | ४.६ | २.२ | ६०५५ |
| राजस्थान | ६.२ | ३.५ | ५२२० |

( टिप: १९८०-८१ च्या किमती १९८०-८१ ते १९९३-९४ करीता )